मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील १३९ मुरबाड मतदारसंघातील ४६/फ बदलापूर हे कार्यालय नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील कल्याण परिमंडळ कार्यालयाशी संलग्न ठेवण्यास प्रशासकीय व कार्योत्तर मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : निशिका-६९२५/प्र.क्र.१०७/ना.पु.१५**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०३ जुलै, २०२६.

**संदर्भ :** १) शा. नि.,अ.ना.पु.व ग्रा.सं.वि. क्र.संकीर्ण-१०१७/प्र.क्र.१५६/ना.पु.१२, दि. १८.०४.२०२२.
२) शा.नि.,अ.ना.पु.व ग्रा.सं.वि. क्र.पदनि-११२२/प्र.क्र.१३३/ना.पु.१५, दि. २५.०८.२०२२.
३) शा.नि.,अ.ना.पु.व ग्रा.सं.वि. क्र.निशिका-६९२३/प्र.क्र.२६६/ना.पु.१५, दि. ०३.१०.२०२५.
४) शा. नि.,अ.ना.पु.व ग्रा.सं.वि. क्र.आस्थाप्र-१८२२/प्र.क्र.७२/ना.पु.१२, दि. ०३.१२.२०२५.
५) शा.नि.,अ.ना.पु.व ग्रा.सं.वि. क्र.निशिका-६९२५/प्र.क्र.१०७/ना.पु.१५, दि.१५.१२.२०२५.
६) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे पत्र क्र. निशि/निवास/प्र.क्र.१८/२०२३/सात /जा.क्र. १५१,दि.२३.०४.२०२६.
७) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे आदेश क्र. निशि/आस्था/४-अ /पदोन्न/०१/२०२६/ जा.२७२,दि.२७.०४.२०२६.
८) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे आदेश क्र. निशि/आस्था/४-अ /पदोन्न/०१/२०२६/ जा.२७५,दि.२७.०४.२०२६.
९) शा.नि.,अ.ना.पु.व ग्रा.सं.वि. क्र.निशिका-६९२६/प्र.क्र.१०९/ना.पु.१५, दि.१५.०५.२०२६.

**प्रस्तावना :**

संदर्भ क्र. १ येथील दि. १८.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयांतील पदांच्या आढाव्याअंती सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे व त्याप्रमाणे कार्यालयनिहाय पदांचे वर्गीकरण दि.२५.०८.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहेत.

२. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नवीन शिधावाटप कार्यालय सुरू करण्याबाबतचे मानदंड व मानके दि. ०३.१०.२०२५ रोजीचे शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहे.

३. या विभागाच्या दि.१८.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या सुधारीत आकृतीबंधातील पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई (विवरणपत्र क्र.२) व संचालनालय नागरी पुरवठा (गोदाम व वाहतूक), मुंबई (विवरणपत्र क्र. ३) ह्या कार्यालयाकरीता मंजूर केलेली अनुक्रमे ३० व ४२ नियमित पदे अशी एकूण ७२ नियमित पदे नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयात दि.०३.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थानांतरीत करण्यात आले असून दि.१८.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयासोबतचे विवरणपत्र क्र.७ सुधारीत करण्यात आले आहे. त्यानुसार

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाकरीता १२०० नियमित पदे व २६३ पदे बाह्ययंत्रणेव्दारे असा सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.

तसेच, या विभागाच्या दि.१५.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील विधानसभा मतदारसंघनिहाय शिधावाटप कार्यालयांची पुनर्रचना करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

४. सदर शासन निर्णयानुसार सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या ४७ शिधावाटप कार्यालयांपैकी ६ शिधावाटप कार्यालये बंद होऊन नविन १० शिधावाटप कार्यालये अस्तित्वात येणार आहेत. अशाप्रकारे एकूण ५१ (४७-६+१०=५१) शिधावाटप कार्यालयांची निर्मिती करण्यास तसेच पुर्वीच्या फ परिमंडळ ठाणे कार्यालयातील कामकाजाचा आवाका वाढणार असल्यामुळे कामकाजाच्या सुरळीत नियोजनाकरिता, फ परिमंडळ कार्यालयाचे विभाजन करुन प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने एक नवीन परिमंडळाची (कल्याण परिमंडळाची) निर्मिती करण्यास शासन मान्यता प्राप्त झाली असून सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ६ व विवरणपत्र ५ मध्ये नमूद नुसार विधानसभा मतदार संघनिहाय शिधावाटप कार्यालयाच्या पुनर्रचनेनंतर ज्या शिधावाटप कार्यालयातील दुकाने मुंबई-ठाणे विधानसभा व्यतिरिक्त, ग्रामीण विधानसभा मतदारसंघात येतात, अशी १३९- मुरबाड मतदारसंघातील शिधावाटप कार्यालय क्र. ४६/फ बदलापूर अंतर्गत येणारी ३२ दुकाने मुरबाड तहसिल कार्यालयाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

५. बदलापूर येथील स्थानिक लोकप्रतिनधी खासदार, आमदार, नगरसेवक, तसेच सर्वसामान्य जनतेचा ४६/ फ बदलापूर हे शिधावाटप कार्यालय मुरबाड तहसिल कार्यालयात वर्ग करण्यास असलेला विरोध पहाता व त्यांची मागणी लक्षात घेता, जनतेची होणारी गैरसोय टाळण्याकरीता शिधावाटप कार्यालय क्र. ४६/फ बदलापूर या कार्यालयातील ३२ दुकाने मुरबाड तहसिल कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेली नाहीत. सदरहू ३२ दुकाने ही नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात संलग्न करण्यात येऊन ४६/फ बदलापूर शिधावाटप कार्यालय हे दि.२३.०४.२०२६ रोजीच्या आदेशामध्ये अंतर्भूत करण्यात आलेले आहे. त्यामुळे शासन निर्णयानुसार मंजूर झालेली शिधावाटप कार्यालयाची संख्या ५१ वरुन ५२ होणार आहे.

६. विधानसभा मतदारसंघनिहाय शिधावाटप कार्यालयाची पुनर्रचना केल्यामुळे नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालय व अधिनस्त कार्यालयाकरीता तात्पुरत्या स्वरूपात निश्चित करण्यात आलेल्या संवर्गनिहाय पदांच्या आकृतीबंधास प्रशासकीय मान्यता व कार्योत्तर मंजूरी मिळण्याबाबतची दि.२७.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली असून सदर प्रस्तावामध्ये ४६/फ बदलापूर शिधावाटप कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची संख्या नमूद करण्यात आली आहे.

त्यास अनुसरुन दि.१५.५.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर प्रस्तावास प्रशासकीय व कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे.

७. १३९ मुरबाड मतदारसंघातील लोकप्रतिनिधी यांच्या विनंतीनुसार व शिधापत्रिकाधारकांची भविष्यातील गैरसोय टाळण्याकरीता, शिधापत्रिकाधारकांच्या सोयीच्या दृष्टीने ४६/फ बदलापूर हे कार्यालय, कल्याण परिमंडळ कार्यालयांतर्गत ठेवण्याकरीता नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या संदर्भ क्र. ६ येथील दि.२३.०४.२०२६ रोजीच्या कार्यालयीन आदेशास प्रशासकीय मान्यता व कार्योत्तर मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

उपरोक्त पार्श्वभुमी विचारात घेता, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अधिनस्त सर्व परिमंडळ कार्यालयाकडून प्राप्त शिधावाटप कार्यालयनिहाय दुकानांची संख्या दर्शविण्यात आलेल्या प्रमाणपत्रानुसार, पुनर्रचनेनंतर विधानसभा मतदारसंघनिहाय शिधावाटप कार्यालयांची संख्या व संलग्न दुकाने याबाबतच्या संदर्भ क्र. ६ येथील दि.२३.०४.२०२६ रोजीच्या आदेशासोबतच्या विवरणपत्रातील तपशिलास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय संदर्भ क्र. १ येथील दि.१८.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयास व संदर्भ क्र. ४ येथील दि.०३.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन व संदर्भ क्र. ५ येथील दि.१५.१२.२०२५ रोजीच्या आदेशास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०७०३१४५६४८९८०६ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.07.03 14:57:48 +05'30'

**(पूजा मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

सोबत : विवरणपत्र -अ,ब,क व ड

**प्रति,**

१) मा.मंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव.
२) मा. राज्यमंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव.
३) विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद.
४) महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
५) महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव.
७) अ.मु.स. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
८) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
९) सर्व सहसचिव/उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई.
१२) सर्व उप नियंत्रक शिधावाटप
१३) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अ.ना.पु.वग्रा.सं.वि., मंत्रालय, मुंबई.
१४) निवडनस्ती (ना.पु. १५)

| विवरणपत्र-अ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मतदार संघाचे नाव | जुन्या कार्यालयाचे नाव | ई परिमंडळ कार्यालयाच्या दि.१६.०३.२०२६ रोजीच्या प्रमाणपत्रानुसार वर्ग केलेली शिधावाटप दुकाने | एकूण | प्रस्तावित कार्यालयाचे नाव |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | **ई परिमंडळ, वडाळा** | | | **उपनियंत्रक शिधावाटप प्रादेशिक कार्यालय, कुर्ला** |
| १ | १७४ कुर्ला | ३२ ई कुर्ला | ६८ | ९५ | शिधावाटप कार्यालय क्र. १९ कुर्ला |
| | | ३३ ई चेंबूर | २७ | | |
| २ | १६८ चांदिवली | ३४ ई घाटकोपर | ३० | ११४ | शिधावाटप कार्यालय क्र. २० चांदिवली |
| | | ३२ ई कुर्ला | ८४ | | |
| ३ | १७३ चेंबूर | ३३ ई चेंबूर | ७१ | ७१ | शिधावाटप कार्यालय क्र. २१ चेंबूर |
| ४ | १७२ अणुशक्तीनगर | ३३ ई चेंबूर | २४ | ७७ | शिधावाटप कार्यालय क्र. २२ अणुशक्तीनगर |
| | | ४४ ई गोवंडी | ५३ | | |
| ५ | १७१ मानखुर्द शिवाजीनगर | ४४ ई गोवंडी | १२५ | १२५ | शिधावाटप कार्यालय क्र. २३ मानखुर्द शिवाजीनगर |
| ६ | १७० घाटकोपर (पूर्व) | ३४ ई घाटकोपर | ३९ | ६० | शिधावाटप कार्यालय क्र. २४ घाटकोपर (पू.) |
| | | ३३ ई चेंबूर | १९ | | |
| | | ४५ ई विक्रोळी | २ | | |
| ७ | १६९ घाटकोपर (प.) | ४५ ई विक्रोळी | २५ | ८९ | शिधावाटप कार्यालय क्र. २५ घाटकोपर (प.) |
| | | ३४ई घाटकोपर | ६४ | | |
| ८ | १५६ विक्रोळी | ४५ ई विक्रोळी | ३७ | ६५ | शिधावाटप कार्यालय क्र. २६ विक्रोळी |
| | | ३० ई भांडूप | २८ | | |
| ९ | १५७ भांडूप | ३० ई भांडूप | ८० | ८१ | शिधावाटप कार्यालय क्र. २७ भांडूप |
| | | ३५ ई मुलुंड | १ | | |
| १० | १५५ मुलुंड | ३५ ई मुलुंड | ६५ | ६५ | शिधावाटप कार्यालय क्र. २८ मुलुंड |
| एकूण | | | ८४२ | ८४२ | |

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.07.03 14:58:14 +05'30'

(पूजा मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र-ब

| अ.क्र. | मतदार संघाचे नाव | जुन्या कार्यालयाचे नाव | ग परिमंडळ कार्यालयाच्या दि.१६.०३.२०२६ रोजीच्या प्रमाणपत्रानुसार वर्ग केलेली शिधावाटप दुकाने | एकूण | प्रस्तावित कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | ग परिमंडळ, कांदिवली | | | उपनियंत्रक शिधावाटप प्रादेशिक कार्यालय, कांदिवली |
| १ | १६३ गोरेगाव | ४२ ग मालाड | १४ | ९२ | शिधावाटप कार्यालय क्र.२९ गोरेगाव |
| | | २७ ग गोरेगाव | ७८ | | |
| २ | १५९ दिंडोशी | २८ ग कांदिवली | ११ | ९४ | शिधावाटप कार्यालय क्र.३० दिंडोशी |
| | | ४२ ग मालाड | ७० | | |
| | | २७ ग गोरेगाव | १३ | | |
| ३ | १६२ मालाड | ४२ ग मालाड | ८२ | ८२ | शिधावाटप कार्यालय क्र. ३१ मालाड |
| ४ | १६० कांदिवली | २८ ग कांदिवली | ४३ | ७१ | शिधावाटप कार्यालय क्र.३२ कांदिवली |
| | | ४२ ग मालाड | २८ | | |
| ५ | १६१ चारकोप | २८ ग कांदिवली | ८० | ८७ | शिधावाटप कार्यालय क्र.३३ चारकोप |
| | | ४२ ग मालाड | ०७ | | |
| ६ | १५२ बोरीवली | २८ ग कांदिवली | १३ | ६४ | शिधावाटप कार्यालय क्र.३४ बोरिवली |
| | | ४२ ग मालाड | ०१ | | |
| | | ४३ ग बोरीवली | ५० | | |
| ७ | १५४ मागाठाणे | ४७ ग दहिसर | २९ | ८३ | शिधावाटप कार्यालय क्र.३५ मागाठाणे |
| | | २८ ग कांदिवली | ३३ | | |
| | | ४३ ग बोरीवली | २१ | | |
| ८ | १५३ दहिसर | ४७ ग दहिसर | ४२ | ७४ | शिधावाटप कार्यालय क्र.३६ दहिसर |
| | | ४३ ग बोरीवली | ३२ | | |
| | | | ६४७ | ६४७ | |

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT,
2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.07.03 14:58:29 +05'30'

(पूजा मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

| विवरणपत्र-क | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मतदार संघाचे नाव | जुन्या कार्यालयाचे नाव | फ परिमंडळ कार्यालयाच्या दि.१७.०३.२०२६ रोजीच्या प्रमाणपत्रानुसार वर्ग केलेली शिधावाटप दुकाने | एकूण | प्रस्तावित कार्यालयाचे नाव |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | फ परिमंडळ, ठाणे | | | उपनियंत्रक शिधावाटप प्रादेशिक कार्यालय, ठाणे |
| १ | १४५ मिरा भाईंदर | ४१ फ भाईंदर | ८३ | ८३ | शिधावाटप कार्यालय क्र. ३७-मिरा भाईंदर |
| २ | १४६ ओवळा माजिवडा | ३६ फ ठाणे | ३२ | ८५ | शिधावाटप कार्यालय क्र.३८-ओवळा माजिवडा |
| | | ४१ फ ठाणे | १४ | | |
| | | ४१ फ भाईंदर | ३९ | | |
| ३ | १४७ कोपरी पाचपाखाडी | ३६ फ ठाणे | १०७ | १०७ | शिधावाटप कार्यालय क्र.३९-कोपरी पाचपाखाडी |
| ४ | १४८ ठाणे | ३६ फ ठाणे | ६६ | ९१ | शिधावाटप कार्यालय क्र.४०-ठाणे |
| | | ४१ फ ठाणे | २५ | | |
| ५ | १४९ मुंब्रा-कळवा | ४१ फ ठाणे | ४९ | ९५ | शिधावाटप कार्यालय क्र.४१-मुंब्रा कळवा |
| | | ४८ फ मुंब्रा | ४६ | | |
| ६ | १५० ऐरोली | ४१ फ ठाणे | ३४ | ६९ | शिधावाटप कार्यालय क्र.४२-ऐरोली |
| | | ४१ फ वाशी | ३५ | | |
| ७ | १५१ बेलापुर | ४१ फ वाशी | ६९ | ६९ | शिधावाटप कार्यालय क्र.४३-बेलापूर |
| | | | **५९९** | **५९९** | |

POOJA PRASAD
MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.07.03 14:58:46 +05'30'

**(पूजा मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

| विवरणपत्र-ड | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मतदार संघाचे नाव | जुन्या कार्यालयाचे नाव | फ परिमंडळ कार्यालयाच्या दि.१७.०३.२०२६ रोजीच्या प्रमाणपत्रानुसार वर्ग केलेली शिधावाटप दुकाने | एकूण | प्रस्तावित कार्यालयाचे नाव |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ८ |
| | | **कल्याण परिमंडळ,** | | | **उपनियंत्रक शिधावाटप प्रादेशिक कार्यालय, कल्याण** |
| १ | १४३ डोंबिवली | ३९ फ मुख्य डोंबिवली | ६१ | ९४ | शिधावाटप कार्यालय क्र.४४ डोंबिवली |
| | | ३९ फ उप डोंबिवली | ३३ | | |
| २ | १३८ कल्याण पश्चिम | ३८ फ कल्याण | ९९ | ९९ | शिधावाटप कार्यालय क्र.४५ कल्याण पश्चिम |
| ३ | १४२ कल्याण पूर्व | ३८ फ कल्याण | ६० | ९८ | शिधावाटप कार्यालय क्र.४६ कल्याण पूर्व |
| | | ४० फ मुख्य उल्हासनगर | ३८ | | |
| ४ | १४४ कल्याण ग्रामीण | ३८ फ कल्याण | १३ | १२६ | शिधावाटप कार्यालय क्र.४७ कल्याण ग्रामीण |
| | | ३९ फ उप डोंबिवली | ८१ | | |
| | | ४० फ मुख्य उल्हासनगर | २ | | |
| | | ४८ फ मुंब्रा | ३० | | |
| ५ | १३६ भिवंडी पश्चिम | ३७ फ भिवंडी | ८५ | ८५ | शिधावाटप कार्यालय क्र.४८ भिवंडी पश्चिम |
| ६ | १३७ भिवंडी पूर्व | ३७ फ भिवंडी | ८० | ८० | शिधावाटप कार्यालय क्र.४९ भिवंडी पूर्व |
| ७ | १४१ उल्हासनगर | ४० फ उप उल्हासनगर | १०९ | १०९ | शिधावाटप कार्यालय क्र.५० उल्हासनगर |
| ८ | १४० अंबरनाथ | ४० फ मुख्य उल्हासनगर | ४१ | १२७ | शिधावाटप कार्यालय क्र.५१ अंबरनाथ |
| | | ४६ फ अंबरनाथ | ८६ | | |
| ९ | १३९ मुरबाड मतदारसंघ | ४६ फ बदलापूर | ३२ | ३२ | शिधावाटप कार्यालय क्र. ५२ बदलापूर |
| | | | ८५० | ८५० | |

POOJA PRASAD
MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT,
2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164,
cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.07.03 14:59:04 +05'30'

**(पूजा मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**